केंद्र पुरस्कृत "स्वजलधारा" योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर व जिल्हास्तरावर **"स्वजलधारा कक्ष"** स्थापन करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक ग्रापापु १००६/प्रक्र-३७४/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ऑक्टोबर २००६**

**वाचा :** शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि.,क्रमांक ग्रापापु १००४/प्रक्र.४७/पापु-०७, दिनांक २.४.२००४

**प्रस्तावना :**

केंद्र पुरस्कृत "स्वजलधारा" योजनेच्या अंमलबजावणीचे राज्यस्तरावरुन करावयाचे अपेक्षित संनियंत्रण, निरिक्षण, मार्गदर्शन व समन्वय यासाठी राज्यस्तरावर **"राज्य स्वजलधारा कक्षाची"** निर्मिती करण्याचे संदर्भिय दिनांक २ एप्रिल, २००४ च्या शासन निर्णयान्वये ठरविण्यात आले होते.

२. वरील प्रमाणे निर्माण करावयाच्या स्वजलधारा कक्षामधील पदे सुरवातीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा व मंत्रालयातील सध्याच्या अधिकाऱ्यांमधून भरण्याचे प्रस्तावित केले होते. तथापि, यासाठी स्वतंत्र पदे निर्माण केली नसल्याने **या कक्षामधील पदे भरून स्वजलधारा कक्ष अद्याप पर्यंत अस्तित्वात आलेला नाही.** स्वजलधारा प्रकल्पाकरीता स्वतंत्र पदे निर्माण करून कक्ष निर्माण करण्याबाबत कामाचा व्याप पाहून निर्णय घेण्यात येईल असे संदर्भिय शासन निर्णयात नमूद केले होते.

३. स्वजलधारा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमधील परिच्छेद १५.८ व १५.९ नुसार केंद्र शासन स्वजलधारा योजनेअंतर्गत राज्यास दरवर्षी मंजूर होणाऱ्या नियतव्ययाच्या **१०% रक्कम IEC / HRD** साठी व **५% रक्कम प्रशासकीय खर्चासाठी मंजूर करणार आहे.**

४. स्वजलधारा योजना सन २००२-०३ पासून राज्यात कार्यान्वित असून या योजने अंतर्गत राज्यात सन २००२-०३ ते २००५-०६ पर्यंत रू. १५८.६१ कोटी किंमतीच्या १६६९ योजना मंजूर करण्यात आल्या असून त्या प्रगतीपथावर आाहेत. परंतु, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यस्तरावरुन व जिल्हास्तरावरून करावयाच्या अपेक्षित सनियंत्रण, निरिक्षण यासाठी स्वतंत्र कक्ष अस्तित्वात आला नसल्याने या योजनेची माहिती संकलीत करून ती केंद्र शासनास सादर करण्यात अडचणी येत असून त्यामुळे योजनेची प्रगतीही दिसून येत नाही.

५. त्यामुळे, स्वजलधारा योजनेचे राज्यस्तरावरून व जिल्हास्तरावरून सनियंत्रण, मार्गदर्शन व समन्वय करणे आवश्यक असल्याने **राज्यस्तरावर व जिल्हास्तरावर स्वजलधारा कक्ष** निर्माण करून या कक्षामधील पदांवरील खर्चासाठी व या योजनेअंतर्गत करावयाच्या प्रचार प्रसिध्दी व क्षमता बांधणी

कार्यक्रमासाठी जिल्हा परिषदांना/ गावांना निधी उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून, स्वजलधारा योजनेचे सनियंत्रण, निरीक्षण, मार्गदर्शन व समन्वयासाठी **राज्यस्तरावर व जिल्हास्तरावर** (भंडारा, गोंदिया व गडचिरोली जिल्हे वगळून) पुढील प्रमाणे संस्थात्मक व्यवस्था (स्वजलधारा कक्ष) निर्माण करण्यास शासन मंजूरी देत आहे:-

(१) **राज्य स्वजलधारा कक्ष (राज्यस्तर)**

**रचना**

| अ.क्र. | राज्य स्वजलधारा कक्षामधील पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी | पद भरण्याची कार्यपध्दती |
|---|---|---|---|---|
| १ | प्रकल्प व्यवस्थापक (स्वजलधारा) | ०१ | १०६५०-१५८५० | मविसे मधील वर्ग-१ चे अधिकाऱ्याचे प्रतिनियुक्ती द्वारे अथवा म.जी.प्रा. मधील कार्यकारी अभियंता दर्जाच्या अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्ती द्वारे |
| २ | सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक | ०१ | ८०००-१३५०० | मविसे मधील वर्ग-२ चे अधिकाऱ्याचे प्रतिनियुक्ती द्वारे अथवा म.जी.प्रा. मधील उप अभियंता दर्जाच्या अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्ती द्वारे |
| ३ | तांत्रिक अधिकारी | ०२ | ५५००-९००० | जि.प./म.जी.प्रा. मधील शाखा अभियंता /कनिष्ठ अभियंता अथवा भू.स.वि. यं.तील कनिष्ठ भूवैज्ञानिक यांच्या प्रतिनियुक्ती द्वारे |
| ४ | लिपिक टंकलेखक / डाटा एन्ट्री ऑपरेटर | ०२ | ३०५०-४५९० (कंत्राटी पध्दतीने रु. ६५००-७००० द.मा.) | जि.प./म.जी.प्रा. मधील योग्य कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्ती द्वारे अथवा कंत्राटी पध्दतीने |
| ५ | शिपाई | ०१ | २५५०-३२०० (कंत्राटी पध्दतीने रु. ५००० द.मा.) | जि.प./म.जी.प्रा. मधील योग्य कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्ती द्वारे अथवा कंत्राटी पध्दतीने |
| | एकूण | ०७ | | |

**कार्यकक्षा**

(अ) योजनेच्या भौतिक व आर्थिक प्रगतीचे सनियंत्रण करणे व संबंधितांना आवश्यक माहिती देणे.

(ब) योजनेच्या संदर्भात आवश्यक नोंदी जिल्ह्यांकडून केंद्र शासनाच्या वेबसाईटवर करून घेणे.

(ब) योजनांच्या प्रगतीची माहिती संबंधित गावांकडून घेऊन ती संकलीत करणे व योजनेचा भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल राज्य शासनास व केंद्र शासनास दरमहा पाठविणे. (टपालाद्वारे व ऑनलाईन)

(क) योजनेत निवडलेल्या गावांची केंद्र शासनाच्या वेबसाईट वर डाटा ऐंट्री करणे.

(ड) योजनेची योग्य प्रगती साधण्यासाठी संबंधित गावांना मार्गदर्शन करणे व योजना पूर्ण करून घेणे.

(इ) स्वजलधारा योजनेची तत्वे ग्रामस्तरापर्यंत तसेच पदाधिकारी, अधिकारी यांच्या पर्यंत पोहचविणे.

(ई) जिल्हा परिषदेतील जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती तसेच जिल्हा कार्यवारी समितीस सहाय्य करणे.

**कक्षाचे नियंत्रण**

सदर कक्ष कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांच्या संपूर्ण प्रशासकीय व तांत्रिक नियंत्रणाखाली त्यांच्या कार्यालयात कार्यरत राहील.

**कक्षामधील पदांवरील वेतन व भत्त्यांचा खर्च**

सदर कक्षामधील पदांवर कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचाऱ्यांचा वेतन व भत्यावरील खर्च स्वजलधारा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यास दरवर्षी IEC / HRD व प्रशासकीय खर्चासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या तरतूदीमधून जिल्हयास देण्यात येणाऱ्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

जिल्हा स्वजलधारा कक्षामधील पदे भरण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना प्रदान करण्यात येत आहेत. त्यांनी यासाठी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करून पारदर्शक निवड प्रक्रिया अवलंबून ही कार्यवाही त्वरीत करावी.

२. सदर पदे स्वजलधारा योजनेची अंमलबजावणी जो पर्यंत केंद्र शासनाकडून सुरु आहे व प्रशासकीय खर्चासाठी केंद्र शासन निधी उपलब्ध करून देत आहे तो पर्यंत अस्तित्वात राहतील. यासाठी केंद्र शासनाकडून ज्या दिवसापासून निधी मिळण्याचे बंद होईल अथवा केंद्र शासन ज्या दिवसापासून योजना बंद करेल त्या दिवसापासून पदे आपोआप रद्य होतील.

३. स्वजलधारा योजनेची गुणवत्ता राखण्याच्या दृष्टिने **राज्यस्तरावरून व जिल्हास्तरावरून** स्वतंत्र यंत्रणेमार्फत तपासणी करणे आवश्यक आहे. स्वजलधारा योजने अंतर्गत सुरू असलेल्या कामांच्या गुणवत्तेची तपासणी करून घेण्यासाठी जिल्हा परिषदांनी स्वतंत्र (या क्षेत्रात सक्षम असलेल्या) यंत्रणेची निवड करून तपासणी करून घेग्यात यावी. या तपासणीसाठी येणारा खर्च जिल्हयांना स्वजलधारा योजनेअंतर्गत IEC/HRD व प्रशासकीय खर्चासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. स्वजलधारा योजनेअंतर्गत राज्यास मंजूर नियतव्ययाच्या १०% रक्कम IEC/HRD साठी दरवर्षी प्राप्त होत/होणार आहे. यापैकी ५% तरतूद राज्यस्तरावरून करावयाच्या IEC/HRD साठी

(क) योजनेअंतर्गत सुरु असलेल्या कामांची तपासणी करणे व कामाची गुणवत्ता राखण्यासंदर्भात उप सचिव व प्रकल्प संचालक (सुधारणा सहाय व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष) यांच्याशी चर्चा करून आवश्यक ते मार्गदर्शन करणे.

(ड) योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनूसार योजनांची कार्यवाही होत असल्याबाबत खात्री करून घेणे.

(इ) राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या "राज्य शिखर समितीस" व "राज्य कार्यकारी समितीस" योजनांच्या प्रगतीची माहिती वेळोवेळी सादर करणे.

**कक्षाचे नियंत्रण**

सदर कक्ष सह सचिव तथा प्रकल्प संचालक, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष यांच्या संपूर्ण प्रशासकीय व तांत्रिक नियंत्रणाखाली राहील.

**कक्षाचे मुख्यालय**

सदर कक्ष सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्षा अंतर्गत (RSPMU) बेलापूर येथे कार्यरत राहिल.

**कक्षामधील पदांवरील वेतन व भत्त्यांचा खर्च**

सदर कक्षामधील पदांवरील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतन व भत्यावरील खर्च स्वजलधारा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यास दरवर्षी **IEC / HRD** व प्रशासकीय खर्चासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या तरतूदीमधून राज्यस्तरावर राखून ठेवण्यात तरतूदीमधून भागविण्यात यावा.

राज्य स्वजलधारा कक्षामधील पदे भरण्याचे अधिकार प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय यांना राहतील.

(२) **जिल्हा स्वजलधारा कक्ष (जिल्हास्तर)**

| अ.क्र. | पदनाम | पद | दरमहा वेतन (रुपये) | पद भरण्याचा मार्ग |
|---|---|---|---|---|
| १ | मनुष्यबळ विकास व संवाद तज्ञ | १ | ८०००-१०००० | कंत्राटी पध्दतीने |
| २ | सनियंत्रण व मुल्यमापन तज्ञ | १ | ८०००-१०००० | कंत्राटी पध्दतीने |
| | **एकूण** | २ | | |

**कार्यकक्षा**

(अ) स्वजलधारा योजनेसाठी निवडलेल्या गावांमध्ये प्रचार, प्रसिध्दी करून संबंधित ग्राम पंचायतींच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची क्षमता बांधणी करून घेणे.

राखून ठेवून उर्वरित ५% तरतूद संबंधित जिल्हयांना दरवर्षी मंजूर करण्यात येणाऱ्या नियतव्ययाच्या प्रमाणात मुक्त करण्यास शासन मान्यता देत आहे.

५. स्वजलधारा योजनेअंतर्गत राज्यास मंजूर नियतव्ययाच्या ५% रक्कम प्रशासकीय खर्चासाठी दरवर्षी प्राप्त होत/होणार आहे. यापैकी २.५% तरतूद राज्यस्तरावरील स्वजलधारा कक्षाच्या व इतर प्रशासकीय खर्चासाठी राखून ठेवून उर्वरित २.५ % तरतूद संबंधित जिल्हयांना दरवर्षी मंजूर करण्यात येणाऱ्या नियतव्ययाच्या प्रमाणात मुक्त करण्यास शासन मान्यता देत आहे.

६. जिल्हयांना अशाप्रकारे प्राप्त होणाऱ्या रकमेमधून जिल्हा स्वजलधारा कक्षा मधील पदांचा व इतर प्रशासकीय खर्च भागवावा. तसेच, शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक २१.८.२००६ मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित गावांना IEC/ HRD साठी रू. ५०००/- या रकमे मधून देण्यात यावेत.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००६१०१६१४२६१२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

संजीव कुमार 17/10/06

(संजीव कुमार)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव

मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव

मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव

मा. अध्यक्ष , जिल्हा परिषद, (सर्व)

मा. मुख्य सचिव

विभागीय आयुक्त (सर्व)

सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई

संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे

जिल्हाधिकारी (सर्व)

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)

प्रकल्प व्यवस्थापक, जलस्वराज्य प्रकल्प, सुधारणा सहाय व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, बेलापूर

प्रकल्प अधिकारी, आपलं पाणी प्रकल्प, सुधारणा सहाय व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, बेलापूर

मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)

उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)

अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)

तहसीलदार (सर्व)

जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)

जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)

कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)

उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद, (सर्व)

गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)

महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई

महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), नागपूर

मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.

उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर

वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

मंत्रालयातील इतर सर्व विभाग

संगणक कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने